१४ जिल्हे एपीएल-डीबीटी (केशरी) शेतकरी योजनेसाठी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शा.नि.क्रमांक : विसउस/का-४(अर्थ)/APL(DBT)१४जिल्हे शेतकरी योजना/२०२६-२७/ प्र.क्र.६

जी.टी.हॉस्पिटल कॉम्प्लेक्स, ८ वा मजला,

लो.टि.मार्ग, मुंबई-४००००१.

दिनांक : १७/११/२०२६

वाचा :-

१) अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग शासन निर्णय क्र.अधापु-२०२२/प्र.क्र.४६/नापु-२२,दि.२८,फेब्रुवारी,२०२३

२) अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग शासन परिपत्रक क्रमांक: अधापु-२०२४/प्र.क्र.४६/नापु-२२,दि.२० जून,२०२४

३) अ.ना.पु.वग्रा.सं.वि.शा.नि.क्रमांक:विसउस/का-४(अर्थ)/APL(DBT)/२०२४-२५/ प्र.क्र. ६००

दि.०७ फेब्रु. २०२५

४) अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग शासन निर्णय क्रमांक:अधापु-२०२४/प्र.क्र.१२/नापु-२२,दि.२५ जुलै,२०२५

५) वित्त विभाग/व्यय-१० यांचा अनौपचारीक संदर्भ क्र.५९९/२०२६/ व्यय-१०, दि.२९ जुलै,२०२६

६) अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग शासन निर्णय क्रमांक:अधापु-२०२५/प्र.क्र.११/नापु-२२,दि.३० ऑक्टोंबर,२०२६

प्रस्तावना :-

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्र.अधापु-२०२२/प्र.क्र.४६/नापु-२२, दि.२८ फेब्रुवारी,२०२३ अन्वये छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा जिल्हा, शेतकरी आत्महत्याग्रस्त अशा १४ जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना अन्नधान्याऐवजी माहे जानेवारी, २०२३ पासून प्रतिमाह प्रति लाभार्थी रू.१५०/- इतक्या रोख रकमेच्या थेट हस्तांतरणाची योजना कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. विभागाच्या दि. २० जून २०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना थेट रोख रक्कम हस्तांतरण योजनेनुसार देय असलेल्या रक्कमेत प्रतिमाह प्रति लाभार्थी रू.१७०/- अशी वाढ करण्यात आली आहे.

मा. सचिव (अ.ना.पु.व ग्रा.सं. वि.) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२ व २३ जानेवारी, २०२५ रोजी पार पडलेल्या विभागाच्या आढावा बैठकीमध्ये "सदर योजना महाआयटी मार्फत DBT करण्याची प्रक्रिया करावी" असा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच ही प्रक्रिया अधिक पारदर्शक, गतिमान, एकात्मिक

करण्यासाठी सदर योजनेच्या शासन प्रक्रियेची पुनर्रचना (GPR) करुन त्यानूसार सदर योजना महाडीबीटी २.० या एकात्मिक प्रणालीवर समाविष्ट (onboard) करण्यास संदर्भ क्र. ६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर योजना Mahadbt २.० प्रणालीद्वारे कार्यान्वित करण्यासाठी प्रमाणभूत कार्यप्रणाली (Standard Operating Procedure - SOP) वर शेतकरी योजनेच्या लाभासाठी पात्र शिधापत्रिकाधारकांची सद्यस्थितीत विभागाकडे उपलब्ध असलेली RCMS वरील माहिती, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्या. यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. तद्नंतर, महासारथी प्रणालीमार्फत RCMS प्रणालीवरील लाभार्थ्यांची माहिती Mahadbt २.० प्रणालीवर स्वयंचलितपणे उपलब्ध करण्यात येईल. याकरिता तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर संबंधित अधिकाऱ्यांना लॉगीन देण्यात येणार आहे.

सबब मागणी क्र २-एम .मुख्य लेखाशिर्ष -२४०८अन्न, साठवण व वखार,-०१ अन्न, -१०१प्रापण व पुरवठा, ((०३प्रापण वितरण व किंमत नियंत्रण, ((२७) (०३शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतरण योजना (कार्यक्रम) (२४०८०८८८(-३३ अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष २०२६-२७ करीता एकूण ४८०.०० कोटी इतकी सुधारित अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे .

यापुर्वी वित्त विभागाकडून सन २०२६-२७ मधील मुळ मंजूर तरतूद रक्कम रु. ११०.०० कोटी पैकी रक्कम रु. ६६.०० कोटी इतका निधी मुक्त करण्यात आला असून, उर्वरित निधी रक्कम रु. ४४.०० कोटी व मंजूर पुरवणी मागणी रक्कम रु.३७०.०० कोटी पैकी रक्कम रु.१२९.००कोटी असा एकूण रु. १७३.०० कोटी इतके अनुदान खर्चाकरीता मुक्त करण्यात आले असून ,सदर निधी वितरीत करण्याची बाब विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

मागणी क्र. एम-२ मुख्य लेखाशिर्ष २४०८- अन्न, साठवण व वखार, ०१-अन्न, १०१-प्रापण व पुरवठा, (०३) प्रापण वितरण व किंमत नियंत्रण, (०३) (२७) शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतरण योजना (कार्यक्रम) (२४०८०८८८) ३३-अर्थसहाय्य या लेखाशीर्षाखाली वित्त विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी रक्कम रु.१७३.०० कोटी अधिदान व लेखा कार्यालयातून आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या सुधारित मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदी मधून आहरित करुन Mahadbt २.० प्रणालीवर वितरीत करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

शासन निर्णय क्रमांक:अधापु-२०२५/प्र.क्र.११/नापु-२२, दि.३० ऑक्टोबर २०२६ मुद्दा क्रमांक ६ नुसार वित्तीय सल्लागार व उपसचिव यांना नियंत्रक अधिकारी तसेच राज्यस्तरीय नोडल अधिकारी (SNO) व लेखाधिकारी, नागरी पुरवठा, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सबब लेखाधिकारी, वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय यांनी अधिदान व लेखा कार्यालयामध्ये देयक सादर करुन रक्कम **रु.१७३,००,००,०००/-**(अक्षरी रुपये एकशे त्र्याहत्तर कोटी मात्र) योजनेशी संलग्न **भारतीय स्टेट बँक (SBI) खाते क्रमांक ४३१८९७४५२०१** मध्ये आहरीत करुन घ्यावी. दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ३ मधील सुचनांनुसार महाडीबीटी पोर्टलवरुन जिल्हास्तरीय सक्षम अधिकारी व राज्य नोडल अधिकारी यांचेकडून पडताळणीअंती प्राप्त बिल किंवा 'रिक्वेस्ट फॉर ट्रान्सफर' (RFT) फाईलवरुन XML फाईल जनरेट करुन पेमेंट ट्रिगर (Payment Trigger) करुन माहे एप्रिल-२०२६ पासून देय रक्कम लाभार्थ्यांना थेट DBT अदा करावी व निधी खर्चासंबंधिचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित नमून्यात वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयास सादर करावे. सदरचे देयक हे सशर्त स्वरुपाचे आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६१११७१२०२२४१६०६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIKRAMSINH UJWALSINH YADAV

Digitally signed by VIKRAMSINH UJWALSINH YADAV
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fcscpd, 2.5.4.20=10B0814D6CFC086374A32A3DCE9BEBB7DDE238A5B813900 6A817485BDD4F6802, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=86BF376DFB56A4A3506714BF7EA767097E227BB4413 D0A42CD1D17667017 58AF, cn=VIKRAMSINH UJWALSINH YADAV
Date: 2026.11.17 12:03:17 +05'30'

(विक्रमसिंह यादव)
वित्तीय सल्लागार व उपसचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
४. मा. मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव.
५. मा. विरोधी पक्ष नेते (विधानसभा, विधानपरिषद)
६. मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव.
७. मा. मंत्री / राज्यमंत्री (सर्व)यांचे खाजगी सचिव.
८. मा.महालेखाकार, महालेखापाल कार्यालय, मुंबई / नागपूर
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

१०. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

११. अपरमुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

१२. अप्पर मुख्य सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

१३. सर्व विभागीय आयुक्त.

१४. सर्व सहसचिव/उपसचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई

१५. सर्व जिल्हाधिकारी,

१६. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.

१७. सर्व उप आयुक्त (पुरवठा),

१८. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२०. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / सर्व अन्नधान्य वितरणअधिकारी,

२१. लेखाधिकारी, वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय, मुंबई

२२.निवडनस्ती.